Incharge

ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-पि (वाय) ३५६

FORM - 1A

N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1 राज्य ........ State जिल्हा ........ District पोलीस ठाणे प्र.स्री.क्र. Police Station पहिली खबर क्र. FIR No. २२ वर्ष Year २०१८ दिनांक Date ३१/०५/२०१८

2. (i) अधिनियम Act प्र. प्र. कायदा १९८८ कलमे Sections ७, १३(१)(ड) सह १३(२)

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार मंगळवार तारीख पासून २९.०५.१८ वेळ १२.१० तारीख पर्यंत ३०/५/१८ वेळ १४.४४ वा.
Occurence of offence : Day Date from Time Date to Time

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date २८/५/१८ वेळ Time ११:३० वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. २१८ तारीख Date ३१/५/१८ वेळ Time २.३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ४ कि.मी. उ/पू. चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name जिल्हा उप निबंधक सह. संस्था (७) मुंबई कार्यालय २ मजला भंडारी बँक इमारत, प्रा. दा. काळे गुरुजी मार्ग, दादर (प), मुंबई. ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place — गाव Village — पोस्ट Post — तालुका Taluka — जिल्हा Dist. — राज्य State —

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station — तालुका Taluka — जिल्हा Dist. — राज्य State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name मिरकील डोईफोडे (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name सुनिल डोईफोडे

(c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age २८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........

(e) पारपत्र क्रमांक Passport No. — दिल्याचा दिनांक Date of Issue — दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation जमिन खरेदी विक्री व लायझनिंग.

(g) धर्म Religion हिंदु जात Caste — जनजात Sub-Caste —

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward सत्यम पॅराडाईज, घर/नाव नंबर House/Name No. फ्लॅ - ३०३, कात्रपगांव, बदलापुर (प) जि. ठाणे. फोन/मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ ओटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road — जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place — गाव Village — पोस्ट Post — पो.स्टे P. Stn. —

तालुका Taluka — जिल्हा Dist. — राज्य State — सध्याचा पत्ता Present Address —

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

विक्रमसिंह मुरलीधर गवळी, वय - ४६ वर्षे कायमचा पत्ता - सी-१/६०२,
उत्तम राऊत स्कीम सहकारी संस्था विश्रांतवाडी, येरवडा पुणे - ६
सध्याचा पत्ता - सेक्टर नविन ५०, खो.नं. ४०४, शंकर हेरीटेज सहकारी संस्था.
सी वुड नेरुळ ...

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........................................................
Reasons for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ....रु.25000/-......
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........................................................
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तक्रारदार यांनी विमला न्यु मॅर कॉर्नेल हाईट सोसायटी, बोरीवली यांचे डीम कन्व्हेन्स पूर्ण करुन देण्याचे काम घेतलेले होते. तक्रारदार यांनी सदर बाबत आलोसे यांचे कार्यालयात नमुद सोसायटीची कागदपत्रे सादर केल्यानंतर आलोसे यांनी सदर कागदपत्रांची पडताळणी करुन समोरील पक्षकारांना नोटीस द्यावी लागेल असे सांगुन टोकन अमाऊंट म्हणुन रु 25000/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने ला.प्र.वि येथे हजर राहुन लेखी तक्रार दिल्याने दोन पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे हे लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा पंचनाम्यामध्ये आलोसे तक्रारदार यांचे कडून लाचेची रक्कम स्विकारतेच रंगे हाथ ताब्यात घेतले व तक्रारदार निखिल डोईफोडे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन गुन्हा नोंद करण्यात आला.

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ........................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ........................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................... जिल्हा .................... राज्य ....................

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) .............. Rank .................. No. ............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................ (3) Transferred to P. S. ............................ ... District ........................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचं त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

INSPECTOR OF POLICE
ANTI-CORRUPTION BUREAU
सत्यमेव जयते
MUMBAI

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name ....सीमा आडनाईक....
पदनाम Rank ....पोलीस निरीक्षक....
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting
Coding No. of I. O. ........................................

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..............
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

फिर्याद

फि. श्री. निखिल सुनिल डोईफोडे, हि. वय 24 वर्षे, धंदा जमिन खरेदी व विक्री व लायझनिंग, रा. डी. सत्यम पॅराडाईज फ्लॅ - 303, आमपगांव, बदलापूर (प) जि. ठाणे यांचा फिर्यादी जबाब स्वतंत्र कागदावर नोंद घेण्यात आला असुन तोच गुन्ह्याची पहिली खबर म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सीमा आडनाईक)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्याद                दिनांक— ३०/०५/२०१८.

श्री. निखिल सुनिल डोईफोडे, वय— २७ वर्षे, व्यवसाय— जमीन खरेदी विक्री व लायजनिंग, राहण्याचे ठिकाण— सत्यम पॅराडाईज, एफ/३०३, कात्रपगांव, बदलापूर (पुर्व), ठाणे.

.........

मी वरीलप्रमाणे असून गेल्या ६ वर्षापासून माझ्या कुटूंबासमवेत वरील पत्त्यावर राहावयास असून सध्या मी जमिनीचे खरेदी विक्री व लायजनिंग चे काम करीत आहे.

मी जमिनीसंदर्भात कामे करून माझा उदरनिर्वाह करतो. मला न्यु मॅट कॉर्नेल हाईट सोसायटी, बोरीवली पश्चिम, मुंबई या सोसायटीचे डिम कन्हवेन्स करण्याचे काम मला न्यु मॅट कॉर्नेल हाईट सोसायटीचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांनी दिली व सदर कामासाठी मला नमुद सोसायटीकडून कुलमुखत्यार पत्र दिलेले आहे. मी डि.डी.आर ऑफीस ( जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था) दादर यांचे संकेतस्थळावर न्यु मॅट कॉर्नेल हाईट सोसायटीचे डिम कन्हवेन्स करण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला त्याचा अर्ज क्रमांक DC 1004271/2018 असा आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने मी गेल्या दिड महिन्यापुर्वी डी.डी.आर. ऑफीसमध्ये सहाय्यक निबंधक श्री. गवळी यांचेकडे माझे वर नमुद कामासाठी गेलो असता त्यांनी फाईल मधील कागदपत्राच्या त्रुटींची पुर्तता करण्यास सांगितले होते. त्यानुसार मी त्रुटींची पुर्तता करुन पुन्हा दि.११/०५/२०१८ रोजी श्री. गवळी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यावेळी श्री. गवळी यांनी तुमच्या फाईल मध्ये संपुर्ण कागदपत्राची पुर्तता झाली आहे व आता समोरील पक्षाला नोटीस काढावी लागेल व सदर नोटीस साठी मला रक्कम रू.२५,०००/— दे व पुढे जसेजसे काम प्रोग्रेस होईल. तसे तसे मी तुला आमचे साहेब श्री. वीर, यांना सुध्दा किती पैसे दयायचे ते सागेन, त्यानुसार मी श्री.गवळी यांना सोसायटीचे अध्यक्ष यांचेशी बोलून आपल्याला पैशाचे सांगतो. परंतू माझे काम थांबऊ नका. आपण समोरील पक्षाला नोटीस काढा अशी विनंती केली त्यानुसार त्यांनी दिनांक ११/०५/१८ रोजी समोरील पक्षाला नोटीस काढली व त्याची एक प्रत मला देऊन दि.३०/०५/२०१८ रोजी डी.डी.आर कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगितले.

माझी तक्रार आहे की, जर मी लोकसेवक यांना पैसे दिले नाही तर ते माझे डिम कन्व्हेन्स चे काम करणार नाही. माझी लोकसेवक यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही तरी माझी माननीय साहेबांना विनंती आहे की, आपण लोकसेवक श्री.गवळी यांचेवर कायदेशिर कारवाई करावी याबाबत दि.२८/०५/२०१८ रोजी अे.सी.बी. मुंबई कार्यालयात लेखी तक्रार अर्ज दिला.

त्याबाबत मी श्री. गवळी, सहायक निंबधक यांचेकडे सोसायटीचे डिम कन्व्हेन्स संदर्भात समोरील पक्षाला नोटीस काढण्याकरीता दि.११/०५/२०१८ रोजी लोकसेवकाच्या कार्यालयात त्यांना भेटण्यासाठी गेलो असता त्यांनी मला डिम कन्व्हेन्स संदर्भात रक्कम रू. २५,०००/— इतक्या लाचेची मागणी केली परंतू मला सदर लोकसेवक श्री.गवळी यांना कोणत्याही प्रकारे लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.२८/०५/२०१८ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे लोकसेवक श्री.गवळी, सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेविरूध्द तक्रार देण्यासाठी गेलो. सदर विभागातील पोलीस निरीक्षक श्रीमती. सीमा आडनाईक यांनी माझ्या तक्रारीची दखल घेवून माझे स्वहस्ताक्षरामध्ये माझी तक्रार लिहून घेतली. श्री. गवळी यांना दाखविण्यासाठी माझेकडे सोसायटीचे कागदपत्र नसल्याने मी पो.नि. आडनाईक यांना दिनांक

२९/०५/२०१८ रोजी भेटण्यास जाण्याबाबत विनंती केली त्यानुसार पो.नि. आडनाईक यांनी मला दिनांक २९/०५/२०१८ रोजी सकाळी कार्यालयात हजर रहाण्याची समज दिली.

मी दिनांक २९/०५/२०१८ रोजी ला.प्र.वि. कार्यालय, मुंबई येथे सकाळी ११.३०वा. हजर झालो. सदर वेळी पो.नि. सीमा आडनाईक या दोन शासकीय पंचासमवेत सदर ठिकाणी हजर होत्या. त्यांनी माझी ओळख उपस्थित पंचाशी करून देवून माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीगत पंचाना समजावून सांगितली. त्यानंतर माझ्या स्वहस्ताक्षरातील लिहिलेला तक्रार अर्ज पो.नि. सीमा आडनाईक यांनी पंचाना वाचण्यासाठी दिला त्यांनी तो वाचून पाहिला व तक्रार अर्जावर स्वाक्षरी केल्या. त्यानंतर पो.नि. सीमा आडनाईक यांनी समक्ष म्हणून स्वाक्षरी केली व तक्रार अर्ज त्यांचे ताब्यात घेतला.

. त्यानंतर ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात माझे व पंचांच्या आवाजाचे नमुना वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये घेवून माझ्या तक्रारीची पडताळणी दोन शासकिय पंचासमक्ष करण्यात येणार असल्याचे पो.नि. सीमा आडनाईक यांनी मला सांगितले. त्यानुसार पो.नि. सिमा आडनाईक, स.पो.आ. क्षिरसागर, उपस्थित दोन पंच व पोलीस पथक यांचेसह शासकिय वाहनाने मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ४ मुंबई, भंडारी बॅक इमारत, प्र.ल.काळे गुरूजी मार्ग, दादर पश्चिम, मुंबई येथे रवाना झालो. तेथे कार्यालयापासून कांही अंतरावर पोलीस वाहन थांबवून माझे शर्टाचे आत बनियनला पो.नि. आडनाईक यांनी पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन पो.शि. कावळे यांचे मार्फतीने लावला. त्यानंतर मी व पंच लोकसेवक श्री.विजयसिंह गवळी यांची प्रत्यक्ष भेट घेण्या करीता त्यांचे कार्यालयात गेलो. दरम्यान लोकसेवक श्री.विजयसिंह गवळी यांनी पडताळणी पंचनाम्यादरम्यान डिम कन्व्हेन्स संदर्भात समोरील पक्षाला नोटीस काढण्याकरीता रक्कम म्हणून रू.२५,०००/— ची लाच द्यावी लागेल असे मला सांगितले. लोकसेवक श्री गवळी यांचा लाच घेण्याचा उद्देश स्पष्ट झाल्याने पो.नि. सीमा आडनाईक यंनी दि.३०/०५/२०१८ रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवून दि.३०/०५/२०१८ रोजी मला व दोन्ही पंचाना ब्युरो कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक ३०/०५/२०१८ रोजी मी मागणी केलेल्या लाचेची रक्कम रू २५,०००/— स्वतःच्या बचतीतून उपलब्ध करुन ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो त्यावेळी दोन्ही पंच असे ब्युरो कार्यालयात उपस्थित होते. त्यानंतर पो.नि. आडनाईक यांनी ॲसीबी कार्यालयात सापळापुर्व पंचनामा कारवाई पुर्ण करून सापळया करीता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ४ मुंबई, भंडारी बॅक इमारत, प्र.ल.काळे गुरूजी मार्ग, दादर पश्चिम, मुंबई येथे शासकिय वाहनाने पथकासह रवाना झालो. पो.नि. आडनाईक यांचे सुचनेनुसार पो.शि. कावले यांचे मदतीने माझे शर्टाचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावला व मला पंचासह श्री. गवळी यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. सापळा दरम्यान जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ४ मुंबई, भंडारी बॅक इमारत, दादर पश्चिम, मुंबई येथे उपस्थित असलेले श्री.गवळी, सहायक निबंधक यांना जावून त्यांचे कक्षामध्ये भेटलो असता श्री.गवळी, यांनी माझ्याकडून रू.२५,०००/— ची लाचेची मागणी करुन स्विकारली. त्यादरम्यान सापळा पथकाने श्री. गवळी यांना रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले.

तरी दि.२९/०५/२०१८ रोजी लोकसेवक विजयसिंह मुरलीधर गवळी, वय— ४६ वर्षे, सहायक निबधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ४ मुंबई, भंडारी बॅक इमारत, प्र.

समक्ष
(सीमा आडनाईक)
ला.प्र.वि. मुंबई

ल.काळे गुरूजी मार्ग, दादर पश्चिम, मुंबई यांनी सोसायटीचे डिम कन्व्हेन्स मध्ये समोरील पक्षाला नोटीस काढण्याकरीता रक्कम म्हणून रू.२५,०००/— ची लाचेची मागणी केली व दि.३०/०५/२०१८ रोजी सोसायटीच्या डिम कन्व्हेन्स च्या सुनावणी दरम्यान लोकसेवकाचे कार्यालयात हजर राहिलो असता त्यांनी त्यांचे कक्षामध्ये बोलावून त्यांचेकडे सदरचे काम करण्याकरीता रू.२५,०००/— इतक्या लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( सीमा आडनाईक )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.